# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharasthra.gov.in


परिपत्रक/महत्वाचे

क्रमांक: १०/एडीएम/पदविका/२०१९/ ७६२

दिनांक: 29 JUN 2019

विषय:- शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या विविध पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांची या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली संपूर्ण माहिती तपासुन कन्फर्म करणेबाबत...

संदर्भ:- १. महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण क्रमांक २३२, दि. ०५.०७.२०१८.

२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय यांचे शासन निर्णय क्रमांक पत्र क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र. २५२/तांशि-४ दि. ०५.०७.२०१८.

उपरोक्त विषयास अनुसरुन नमुद करण्यात येते की, शासनाचे दि. ०५.०७.२०१८ रोजीच्या संदर्भिय अधिसूचना/शासन निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील विविध पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेची कार्यवाही संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडुन राबविण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने संबंधितांना कळविण्यात येते की, या संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व पदविका संस्थांची संपूर्ण माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असुन सदर माहिती संस्थेच्या प्राचार्यांनी व्यक्तीश: स्वत: तपासणी / पडताळणी करावी. सदर माहितीमध्ये काही तफावत/त्रुटी असल्यास त्याबाबतची माहिती फक्त **diploma19@dtemaharashtra.gov.in** या ईमेलवरच दि. ०३/०७/२०१९ **पर्यंत** सादर करावी. सदर माहितीबाबत काही तफावत/त्रुटी असल्यास व दि. ०३/०७/२०१९ पर्यंत या संचालनालयास कळविले नाही तर संस्थेच्या प्राचार्यांनी सदर माहिती तपासली असे गृहीत धरुन शैक्षणिक वर्ष २०१९-२० चे प्रवेश करण्यात येतील. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या माहितीमध्ये काही तफावत/त्रुटी राहील्यास व संस्थेने त्याबाबत दि. ०३/०७/२०१९ नंतर या संचालनालयास कळविल्यास होणाऱ्या परिणामास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील, यांची नोंद घेण्यात यावी.

(डॉ अभय वाघ)

संचालक

तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई

प्रत:- माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना.

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती,औरंगाबाद, मुंबई, नागपुर, नाशिक,पुणे
२. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर पत्र या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच पुढील उचित कार्यवाही करण्यात यावी.
३. प्राचार्य/संचालक, शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था.
४. निवड नस्ती.